Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २४१ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१२ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### पोलिसबळाचा वापर केला तर जशास तसे उत्तर देणार– राजू शेट्टी

**कोल्हापूर** –रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाच्या कोल्हापूर जिल्ह्यातील चोकाक ते अंकली या महामार्गाच्या मोजणीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून काम सुरु आहे. महामार्गासाठी संपादित होणाऱ्या जमिनीस चौपटीप्रमाणे मोबदला न देता पोलिसबळाचा वापर करून जबरदस्तीने मोजणी केल्यास जशास तसे उत्तर देवू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिला.रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्गाच्या कोल्हापूर जिल्ह्यातील चोकाक ते उदगांव-अंकली या महामार्गाच्या मोजणीबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे. जुन्या बायपास महामार्गावरून महामार्ग व चौपट भरपाई अशी शेतकर्यांची मागणी असताना वारंवार प्राधिकरण मोजणीसाठी येत आहे. सोमवारी उदगांव येथे मोजणीसाठी येताना प्राधिकरणाच्या अधिकार्यांनी पोलिसांची कुमक बोलावून घेतली होती. त्यामुळे पोलिसबळाचा वापर केला तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा स्वाभिमानीचे नेते राजू शेट्टी यांनी दिला आहे.

### भाजपाला आता आरएसएसची गरज नाही

**मुंबई**–विधान परिषदेच्या चार जागांची निवडणूक एकत्र लढवण्याचा महाविकास आघाडी म्हणून काँग्रेसचा विचार आहे. यासंदर्भात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क केला परंतु संपर्क होऊ शकला नाही. अर्ज मागे घेण्यास अजून वेळ असून लवकरच यावर निर्णय होईल, अशी आशा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे.टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, कोकण, मुंबई व नाशिक पदवीधर व शिक्षक मतदारसंघातून निवडणुका होत आहेत. विधान परिषदेच्या कोकण पदवीधर व नाशिकच्या मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची भूमिका काँग्रेस पक्षाने जाहीर केली होती. परंतु शिवसेनेने परस्पर कोकण, नाशिक व मुंबई मतदार संघासाठीचे उमेदवार जाहीर केले. विधान परिषद निवडणुकीचा निर्णय एकत्र बसून केल्यास महाविकास आघाडीला लोकसभेप्रमाणे चांगले यश मिळू शकेल यासाठी काँग्रेसचा प्रयत्न आहे. उद्धव ठाकरे यांना संपर्क केला तेव्हा ते परदेशात होते. आज मातोश्रीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला पण संपर्क होऊ शकला नाही. अजुनही वेळ गेलेली नाही, चर्चेतून मार्ग निघू शकतो असेही नाना पटोले म्हणाले.

### आजही राज्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट

राज्यात यंदा पावसाची चांगली सुरूवात झाली आहे. सगळीकडे वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळताना दिसत आहे. कोकण, सिंधुदुर्ग, रायगड, मध्य महाराष्ट्रामध्ये अहमदनगर, नाशिक, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, बीड, जालना आणि विदर्भ बुलढाणा जिल्ह्यांमध्ये देखील जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. मान्सूनने निम्मा महाराष्ट्र व्यापला असून आजही अनेक जिल्ह्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच येत्या ४८ तासांत अनेक भागात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. आज कोकण आणि उत्तर महाराष्ट्र तसेच मराठवाड्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. कोकणात पावसाचा जोर वाढणार असून येत्या १३ जूनपर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे.येत्या दोन ते तीन दिवसांत मान्सूनचा जोर संपूर्ण राज्यात वाढणार आहे. आज मुंबई पुण्यासह, ठाणे, पालघर तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्याला पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## पक्ष चालवण्यासाठी विनोद तावडे यांची भूमिका मोठी

# त्यांनी सरचिटणीसपदी अत्यंत चांगले काम केले–चंद्रकांत पाटील



**पुणे (वृत्तसंस्था)**–विनोद तावडे यांनी पक्षाच्या सरचिटणीसपदी अत्यंत चांगले काम केले आहे. त्यामुळे लवकरच त्यांना मोठी संधी दिली जाऊ शकते, असे सूचक विधान भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. तर पक्ष चालवण्यासाठी तावडे यांची भूमिका मोठी आहे, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

दरम्यान निवडणुकीत बसलेल्या या फटक्यामुळे आता भाजपचे बैठकीचे सत्र सुरू झाले आहे. सध्या वरिष्ठ पातळीवर नेत्यांच्या बैठका सुरू असून अनेक राज्यांमधील नेतृत्वात मोठे बदल केले जाऊ शकतात, अशी शक्यता वर्तवली जाते आहे. अशातच चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या विधानाने महाराष्ट्र भाजपमध्ये काही बदल होणार का? अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.चंद्रकांत पाटील म्हणाले की, युती तोडून उद्धव ठाकरेंनी काय मिळवले १८ जागांवरून त्यांच्या ९ जागा आल्या. याशिवाय अल्पसंख्याकांच्या जीवावर निवडून आले हा ठपका त्यांच्यावर आहे. विनोद तावडे हे पक्षाच्या सरचिटणीस पदापासून काम करत आहेत. त्यांच्यावर जी जबाबदारी आजपर्यंत दिली ती त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केली आहे. त्यामुळे त्यांना पक्षात आता मोठी संधी दिली जाऊ शकते.

भाजप राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी मनोहरलाल खट्टर, शिवराजसिंह चौहान, भूपेंद्र यादव, धर्मेंद्र प्रदान, सीआर पाटील यांची नावे चर्चेत होती. पण या सर्वांनाच केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळाले. त्यामुळे ही सर्व नावे मागे पडली असून भाजप नव्या नेत्यांच्या शोधात आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस सुनील बन्सल, विनोद तावडे, माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे.

## सावधान ! मोदींच्या नावाने मोफत 'रिचार्ज'चे आमिष

### लिंक वर करू नका क्लिक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेले यश आणि नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होणार असल्याच्या आनंदात भाजपकडून भारतीयांना मोबाइलचे तीन महिन्यांचे रिचार्ज मोफत देण्यात येत आहे,' अशी बतावणी करून सायबर चोरटे लूट करू पाहत आहे .

'रिचार्ज' मिळविण्यासाठी नागरिकांना मोबाइलवर पाठविलेल्या लिंकद्वारे प्रक्रिया करण्यास सांगितले जात असून, नागरिकांनी त्या लिंकवर क्लिक करताच सायबर चोरटे मोबाइलचा ताबा घेतात. अशा प्रकारचे मेसेज नागरिकांना येत असून, सायबर पोलिस आणि तज्ज्ञांनी नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे.




सायबर चोरटे विविध क्लृप्त्या वापरून नागरिकांच्या पैशांवर डल्ला मारतात. त्यात शेअर मार्केट किंवा अन्य प्रकारच्या गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याच्या आमिषाने फसवणूक केली जाते. अर्धवेळ नोकरीच्या निमित्ताने दिलेले ऑनलाइन टास्क असो, की सीबीआय किंवा गुन्हे शाखेच्या कारवाईने दाखविलेली भीती असो; अशा विविध कारणांनी लोकांना सायबर गुन्हेगार गंडा घालत आहेत. केंद्रात भाजपप्रणीत सरकार स्थापन होत असल्याने त्याचे निमित्त साधून सायबर चोरटे ॲक्टिव्ह झाले आहेत. चोरट्यांकडून हे मेसेज पाठविले जात असून, पुण्यातही अनेकांना हे मेसेज आले आहेत. मात्र, अद्याप अशा प्रकारे फसवणूक झाल्याची तक्रार पुण्यात आलेली नाही.

### लिंकवर क्लिक केल्यास फटका

**मेसेजमध्ये आलेल्या लिंकवर क्लिक केल्यानंतर नागरिकांना काही माहिती भरायला सांगितली जाते. ती माहिती दिल्यानंतर मोबाइलचा ताबा सायबर चोरटे घेतात. त्यानंतर सायबर चोरटे नेटबँकिंग किंवा 'यूपीआय'चा वापर करून पैसे ट्रान्स्फर करू शकतात किंवा संबंधिताच्या 'काँटॅक्ट लिस्ट' मधील क्रमांकांना पैशांची मदत मागून इतरांचीही फसवणूक करू शकतात.**

### सायबर चोरट्यांचा मेसेज काय?

**नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार असल्याच्या आनंदात भाजपकडून भारतीय मोबाइलधारकांना ५९९ रुपयांचे तीन महिने मुदतीचे रिचार्ज मोफत दिले जाणार आहे. त्यासाठी खालील https://pmoffer.online या वेबसाइटवर क्लिक करून प्रक्रिया करा.**

## सावरगाव येथे ३२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरांनी केले लंपास

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

रात्रीच्या सुमारास घरातील सर्व सदस्य गाढ झोपेत असताना घराच्या मागील दरवाज्याची कडी काढून ३२ हजार रुपये किमतीचे दागिने लंपास केल्याची घटना दि.१० जून रोजी रात्रौ अंदाजन दिढ वाजताच्या सुमारास नागभीड तालुक्यातील सावरगाव येथे घडली.चोरी झालेल्या घरमालकाचे नाव अनिल योगेश्वर ठिकरे (वय ४३)असे आहे.

तळोधी बा.पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या सावरगाव येथील चोरी प्रकरणात फिर्यादीने दाखल केलेल्या तोंडी



तक्रारीनुसार अनिल योगेश्वर ठीकरे यांच्या घरातली सर्व सदस्य रात्रीचे जेवण आटोपून गाढ झोपी गेले होते. दरम्यान रात्रीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्यांनी घराच्या मागील दरवाज्याची कडी काढून घराच्या आत प्रवेश केला.आणि कपाट खोलून अडीच ग्रॅम सोन्याची नथ,दीढ ग्रॅम वजनाचा सोन्याचा डोरल,एक ग्रॅम वजनाची सोन्याची जिवती, एक ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे रिंग व नगदी २ हजार पाचशे रुपये असा एकूण ३२ हजार रुपये किमतीचे दागिने व रोख अज्ञात चोरांनी लंपास केली. अज्ञात चोरट्यांविरुद्ध तळोधी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किशोर मानकर व सहकारी करीत आहेत.

## दिव्यांग तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद समाजकल्याण विभागामार्फत जिल्हास्तरीय ५ टक्के दिव्यांग कल्याण निधीतून दिव्यांगांकरिता सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात दिव्यांगांसाठी लाभाच्या योजना राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत स्तरावरील पात्र व गरजू दिव्यांग लाभार्थ्यांनी या योजनेकरीता ३१ जुलै २०२४ पर्यंत पंचायत समितींमध्ये अर्ज सादर करावे. सदर योजना पुढीलप्रमाणे आहे.

### ३१ जुलैपर्यंत अर्ज आमंत्रित

दिव्यांगाना साहित्य पुरविणे उदा. तिन चाकी सायकल, पांढरी काठी, श्रवणयंत्र इ. (वैयक्तीक), दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणे (पीठ गिरणी, शिलाई मशिन, झेरॉक्स मशिन, संगणक व प्रिंटर ), दिव्यांग शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे, (शेळीपालन, कुकूटपाजन, दुधव्यवसाय), दिव्यांग शेतकऱ्यांना उत्पन्नाचा दाखल्याची अट न लावता अर्थसहाय्य देणे (शेती विषयक अवजारे, मोटार पंप, ठिबक सिंचन, बि-बियाणे), स्वयंरोगगारार्थ दिव्यांगाना ई-रिक्षा/ ट्रॉली पुरविणे. दिव्यांग जोडप्यांचा सत्कार व प्रोत्साहनपर अनुदान देणे. त्याचप्रमाणे समाज कल्याण विभाग, जि.प. चंद्रपूर च्या २० टक्के मागासवर्गीय कल्याणकारी योजना अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७५ टक्के व ९० टक्के अनुदानावर योजना राबविण्यात येत आहे. यात मागासवर्गीय अल्पभुधारक शेतक-यांना ९० टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे, मागासवर्गीय अल्पभुधारक शेतक-यांना ९० टक्के अनुदानावर सबमर्शिबल विद्युतपंप पुरवठा करणे, ग्रामीण भागातील मागासवर्गीय अल्पभुधारक शेतक-यांना ९० टक्के अनुदानावर ऑईल इंजिन पुरवठा करणे, मागासवर्गीय महिलांना ९० टक्के अनुदानावर शिलाई मशिन / पिकोफॉल मशिन पुरविणे, मागासवर्गीय महिलांना ९० टक्के अनुदानावर आटा चक्की पुरविणे, मागासवर्गीयांना लघु उद्योगासाठी अर्थसहाय्य ई-रिक्षा, झेरॉक्स मशिन इ. ७५ टक्के अनुदानावर पुरविणे.उपरोक्त योजनांचे लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायत मार्फत मागासवर्गीय प्रवर्गातील पात्र व गरजू लाभार्थ्यांनी ३१ जुलै २०२४ पर्यंत पंचायत समितींना अर्ज सादर करावे, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

## आम्हाला बारामतीचा दादा बदलायचा आहे

**बारामती**–आजपासून शरद पवार तीन दिवसांच्या बारामती दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांच्यासमोर कार्यकर्त्यांकडून थेट बारामतीचा दादा बदला अशी मागणी करण्यात आली आहे. शरद पवार यांच्या भेटीसाठी गोविंद बागेत कार्यकर्ते मोठ्या संख्येने आले होते. यावेळी त्यांनी अजित पवारांविरोधात आवाज उठण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बारामतीमध्ये आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाकडून नवीन चेहऱ्याला संधी देण्यात येणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.शरद पवार आज बारामती दौऱ्यावर असताना. कार्यकर्त्यांनी गोविंद बाग गाठून शरद पवारांची भेट घेत युगेंद्र पवार यांचे नाव पुढे करण्यात आले आहे. युगेंद्र पवार यांना उमेदवारी जाहीर करावी, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली. यावेळी आम्हाला बारामतीचा दादा बदलायचा आहे, असा एकच आवाज गोविंद बागेत घुमला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी युगेंद्र पवार विरुद्ध अजित पवार असा सामना होणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळामध्ये रंगली आहे.युगेंद्र पवार हे बारामतीत लक्ष घालत आहेत. लोकांच्या समस्या जाणून त्याच्यावरती मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करत आहेत. एक नवीन चेहरा तुम्ही बारामतीसाठी द्यावा, अशी मागणी या कार्यकर्त्यांनी शरद पवारांकडे केली आहे. हातवारे करत शरद पवारांनी उमेदवारीची चर्चा करू नका, लवकरच निर्णय होईल असे म्हणत कार्यकर्त्यांना संयम ठेवण्याचा सल्ला दिला आहे.

## गोदाम बांधकामा साठी २० जून पर्यंत अर्ज आमंत्रित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय खादयतेल अभियान अंतर्गत सन २०२४-२५ करीता जिल्हयास गोदाम बांधकामाचे लक्षांक प्राप्त झाले आहे. ज्या ठिकाणी गळीतधान्य पिके घेतली जातात, तथापी गोदामाची व्यवस्था नाही, अशा ठिकाणी गोदाम बांधकाम करावयाचे आहे. राष्ट्रीय खादयतेल अभियान अंतर्गत जिल्हयास १ गोदाम बांधकाम घटकाचे लक्षांक प्राप्त आहे. २५० मे. टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १२ लक्ष ५० हजार रुपये यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असून केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना/नाबार्डच्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.सदर घटकासाठी शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (ऋझज/ऋझउ) यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालयात दिनांक २० जून २०२४ पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत करण्यात येत आहे.

## ट्रकच्या धडकेत तरुणाचा मृत्यू सास्ती–राजुरा मार्गावरील घटना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर सास्ती-राजुरा मार्गावर जे. के. ट्रान्स्पोर्टचे अवजड वाहनाने (एमएच. ३४ एवी २५५९) सचिन पिपरे (वय २८, रा. बोर्डा) याच्या दुचाकी वाहनाला धडक दिली. यामध्ये उपचारादरम्यान सचिनचा मृत्यू झाला.

सास्ती-राजुरा मार्गावर नेहमीच अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. त्यात अवजड वाहनाने सचिनच्या दुचाकीला जबर धडक दिली. यामध्ये सचिनच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याने घटनास्थळावरून नागरिकांनी वेकोलि रुग्णवाहिकेने सचिनला प्राथमिक उपचारासाठी वेकोलि चिकित्सालय, धोपटाळा येथे दाखल केले. परंतु, सचिनची अवस्था गंभीर झाल्याने चिकित्सालयातून त्याला राजुरा उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. त्याची गंभीर अवस्था पाहता जिल्हा रुग्णालय,





चंद्रपूर येथे पाठविले.तेथील उपचारानंतर नागपूर येथे उपचारासाठी नेताना भद्रावतीजवळ त्याची प्राणज्योत मावळली. पुढील तपास पोलीस करीत आहे .

# माझ्या लाडक्या बाळा, भरपूर शिकरं शाळा!

**जगामध्ये बालकांना कामगार म्हणून राबविले जाऊ नये आणि बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे. हा जागतिक बालकामगार विरोधी दिनामागचा मुख्य उद्देश आहे. जागतिक बालकामगार विरोधी दिनाची सुरुवात आंतरराष्ट्रीय कामगार संघटना- आयएलओने १२ जून २००२ रोजी केली. बाल कामगारांच्या जागतिक स्थितीवर लक्ष केंद्रित करणे आणि बालमजुरी पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे या उद्देशाने जागतिक बालकामगार विरोधी दिन साजरा करण्यात येतो. रोचक व सुबोध शब्दांतील श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित लेख वाचा... संपादक.**

प्रत्येक जिल्ह्यात सध्या विशेष प्रशिक्षण केंद्रे विविध वस्त्यांमध्ये कार्यान्वित आहेत. प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनात शेकडो कर्मचारी काम करतात. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. बालकामगारांना अनौपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कौशल्य व कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध ट्रेडचे व्यवसायपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते तसेच प्रकल्पाचे कार्य व बालकामगार प्रथेविषयी जनमानसात जनजागृती करण्यात येते. प्रत्येक बालकामगाराला दरमहा १५० रुपये विद्यावेतन देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी मित्र अभ्यासक्रमाचा विशेष प्रशिक्षण केंद्रात अवलंब करण्यात येतो, शालेय पोषण आहार, पाठ्यपुस्तके आणि आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात, बालकामगारांना त्यांच्या आवडीनुसार तसेच त्यांच्यातील कौशल्यास अनुरूप असे व्यवसाय पूर्ण प्रशिक्षण देण्यात येते, बालकामगारांना विविधांगी उपक्रमातून शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात येते. तसेच जीवन कौशल्य राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत बालकामगारांना जीवन कौशल्य विषयाचा प्रभावी संवाद कौशल्य, स्वत:ची जाणीव, प्रभावी नेतृत्व, निर्णयक्षमता, ध्येय निश्चिती, भावनिक समायोजन, कल्पकता, निरीक्षण निरोगी जीवन यासारख्या विविध विषयांच्या माध्यमातून भावी आयुष्यात सुजाण नागरिक घडविण्याचे प्रयत्न केले जातात. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात प्रकल्पाचे कामकाज सुयोग्यरित्या सुरू आहेत. प्रकल्पाच्या सुरूवातीपासून लक्षावधी बालकामगारांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे. तसेच प्रकल्पामार्फत बालकामगारांना जन्म दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, संजय गांधी निराधार योजना, सुकन्या योजना, मतदान ओळखपत्र, जीवनदायी योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यासाठी राज्य शासनाने सन १९८६ सालापासून बालकामगार विरोधी कायदा बनविला असून या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाल्यास भविष्यात बालकामगार होण्यास आळा बसेल.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा... असे आपण नेहमी म्हणतो. कारण बालपणीचा काळ सुखाचा आणि आनंदाचा असतो. ना कसली चिंता ना कसली काळजी, मनसोक्त खेळा, हसा, आनंद लुटा... पण असा हा सुखाचा काळ काही मोजक्याच मुलांच्या नशिबात असतो. कारण जेव्हा आपण घराबाहेर पडून समाजात वावरतो तेव्हा पोटाची खळगी भरण्यासाठी सिग्नलजवळ काही वस्तू विकणारी मुले, हॉटेल, बसस्थानक, रेल्वे स्टेशनवर पाणी वाटणारी, टेबल साफ करणारी मुले पाहतो. अशा मुलांना कुठे सुखाचे बालपण अनुभवायला मिळते? कायदा असूनही त्यांचे बालपण हरवत चालले आहे. हेच ते बालकामगार! १४ वर्षांखालील जी मुले स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार करतात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी घासायची, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात. एकीकडे बोट ठेवलं ती वस्तू विकत घेऊन देणारी हौशी मॉम-डॅड तर दुसरीकडे कामावर पाठविणारी नाईलाज मायबाप. समाजातील हे चित्र कसे बदलेल आणि कोण बदलणार? हा समाजापुढे गहण प्रश्नच आहे. १२ जून हा दिवस देशासह जगात सर्वत्र बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येत आहे.



सन १९८६मध्ये पहिला बालकामगार बंदी आणि नियमन कायदा आला. त्या कायद्यानुसार १४ वर्षांखालील मुलांना मजुरी करणे बेकायदेशीर सांगितले. सन २००२मध्ये बालकामगार थांबविणे किंवा बंदी घालण्याचा सर्वानुमते कायदा मंजूर केला. त्या कायद्यानुसार १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचे शोषण करणे हा गुन्हा मानला गेला. भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद २३ हा मुलांना धोकादायक उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यास परवानगी देत नाही. कलम ४५ अंतर्गत देशातील सर्व राज्यांना १४ वर्षांखालील मुलांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक ठरविले. जिल्ह्या-जिल्ह्यात २००४ पासून जिल्हधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविले जात आहेत. या प्रकल्पांतर्गत ९ ते १४ वयोगटातील धोकादायक, व्यवसायामध्ये काम करणाऱ्या बालकामगारांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यात येते. प्रकल्पाचा मुख्य उद्देश बालकामगारांचा त्यांच्या कामापासून परावृत्त करून शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांच्या पालकांचा आर्थिक स्तर उंचावणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे.

मुले शिकावी म्हणून अशा अनेक योजना शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत राबविल्या जात आहेत. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाच्या माध्यमातून बालकामगार होवू नये, म्हणून सजगता निर्माण केली जात आहे. त्याला जिल्हास्तरावर भरघोस प्रतिसाद मिळत आहे, हेच या प्रकल्पाचे खरे यश आहे. जगामध्ये बालकांना कामगार म्हणून राबविले जाऊ नये आणि बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे, हा जागतिक बालकामगार विरोधी दिनामागचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रात सन १९८६मध्ये बालकामगार कायदा आला; पण तो प्रभावीपणे वापरलेला नाही. सन २०१०मध्ये शिक्षण हक्क कायदा झाला; पण शाळेत अजूनही अनेक जण जात नाहीत. शाळाबाह्य मुले बालकामगार असतात आणि बालकामगार आहेत म्हणून शाळाबाह्य ठरतात. जिल्ह्यात स्थलांतरित बालकामगारांची संख्या अधिक आहे. देशात लाखो मुले शाळेत जात नाहीत. ही गरीब कामगारांची मुले आहेत. याचे सर्वेक्षण होण्याची आवश्यकता आहे. भारतात सन २००९च्या शासन निर्णयानुसार बालकामगार प्रथा रोखण्यासाठी कृती दल स्थापन करण्यात आले, त्याचे जिल्हाधिकारी अध्यक्ष असतात. महिन्यात तीन छापे टाकण्याचे बंधन असताना वर्षात तीन छापे टाकले जात नाहीत. मालकांवर कारवाई करण्यात येत नाही आणि गुन्हेही दाखल केले जात नाहीत, ही फार मोठी शोकांतिका! जिल्ह्याजिल्ह्यांत परप्रांतीय स्थलांतरित अनेक बालकामगार स्वीट मार्ट, कारखाने आणि आईस्क्रीम उद्योगात काम करीत आहेत. कायदे खूप आहेत; परंतु, त्याची अंमलबजावणी होत नाही. बालकामगारांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे हेही दुर्दैवच आहे!

!! आंतरराष्ट्रीय बालकामगार निषेध दिनानिमित्त आठवडाभर सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

## महाराणा प्रताप मातृभूमीच्या रक्षणासाठी लढणारा महापराक्रमी योद्धा-ससाणे



**श्रीरामपूर | प्रतिनिधी**

मातृभूमीच्या रक्षणासाठी महाराणा प्रताप यांनी पराक्रमाची शर्त केल्याचे प्रतिपादन जिल्हा बँकेचे संचालक,माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे यांनी केले. श्रीरामपूर शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित महाराणा प्रताप यांच्या जयंती प्रसंगी ससाणे बोलत होते.

ससाणे पुढे म्हणाले की, महाराणा प्रताप हे महापराक्रमी योद्धा होते. त्यांच्यावर रोमांच उभे करणारी संकटे, दु:खे कोसळली तरीही त्यांनी स्वधर्म, स्वदेशाभिमान आणि सत्यव्रताचरण कधीच सोडले नाही. यावेळी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, माजी नगरसेवक दिलीप नागरे, अशोक जगधने, सुरेश ठुबे, डॉ. राजेंद्र लोंढे, रियाज खान पठाण, नवाजभाई जहागीरदार, अमोल शेटे, लक्ष्मण शिंदे, गणेश काते, विशाल साळवे, राजेश जोंधळे, कुंदनसिंग जुनी, सागर दुपाटी, कल्पेश पाटणी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मध्ये दहावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व पालकांचा गुणगौरव सत्कार संपन्न

**देऊळगांवराजा | प्रतिनिधी**

राजेश पंडित स्थानिक देऊळगावराजा येथील राजलक्ष्मी इंटरनॅशनल (सीबीएसई) स्कूल मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा गुणगौरव सत्कार करण्यात आला .राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशिय सेवाभावी संस्था असोला जहॉगिर द्वारा संचालीत राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मध्ये संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष्या डॉ.सौ. मीनलताई शेळके व सचिव डॉ. रामप्रसादजी शेळके यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी संस्थेचे सचिव डॉ.रामप्रसाद शेळके यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी बोलत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना ज्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये करिअर करायचे आहे ते क्षेत्र निवडण्याची



संधी पालकांनी विद्यार्थ्यांना द्यावी त्यावर सक्तीने आपला निर्णय लादू नये व पाल्यांना जागृतपणे योग्य ते मार्गदर्शन करावे. यावेळी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची उपस्थिती होती .त्यामध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पुढील प्रमाणे तृप्ती शिंगणे ९५% , अनुष्का वाघमारे ९४.४०%, शलाका खरात ९४.२०% , मंदार पेटकर ८६% ,वेदश्री शेळके ८५.४५%. यावेळी उपस्थित पालकांनी व विद्यार्थ्यांनी शाळेविषयी असलेले आपले अनुभव रुपी मनोगत व्यक्त केले यामध्ये विशेष म्हणजे कोणतेही शिकवणी वर्ग न लावता शाळेच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करून विशेष प्राविण्यसह गुण संपादन केले. यावेळी स्कूल चे सी ई ओ सुजित गुप्ता अकॅडमिक हेड डॉ.प्रियंका देशमुख उपप्राचार्य फैजल सर व सिंग सर यांनी कार्यभार पाहिला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रीना निर्मल मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सुनीता टेकाळे मॅडम यांनी केले याप्रसंगी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## आपेगाव येथील गोदावरी नदीवरील पुलाचे काम गेल्या आठ वर्षांपासून संथ गतीने;अनेक गावे सुविधा पासून वंचित

**पैठण | प्रतिनिधी**

तालुक्यातील आपेगाव-कुरणपिंपरी माऊली पालखी मार्गावरील पुलाचे काम गेल्या आठ वर्षांपासून संथ गतीने सुरु आहे. सदरील काम जलद गतीने करण्यात यावे अशी मागणी तसेच अनेकदा तक्रारी करूनही सदर ठेकेदार हा मनमानी वपरमार करून कासव गतीने आपले काम करत आहे. यामुळे पैठण व गेवराई तालुक्यातील नागरीकांचे हाल होत असून अर्थीक नुकसानही सहन करावे लागत असून शालेय विद्यार्थ्यांनाही याचा खूप त्रास होत आहे. त्यातच अवघ्या काही दिवसांवर बर पाऊसाळा येऊन ठेपला तरीदेखील ठेकेदारांच्या कामात कुठली ही गती आपेगाव येथील गोदावरी नदीवरील पुलाचे काम गेल्या आठ वर्षांपासून संथ गतीने अनेक गावे सुविधांपासून वंचित दिसत नाही. पाऊसाला सुरुवात होताच संथ गतीने सुरू असलेले पुलाचे काम बंद पडणार असल्याने याही वर्षी संत ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखीसोहळा या मार्गावरून मार्गक्रमण करणार नाही. रस्ता अभावी माऊली पालखीचे तसेच पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकरी भाविक यांचे हालच होणार आहे. ठेकेदाराच्या बेजबाबदार व निष्काळजीपणामुळे वारकरी संप्रदाय व माऊली मक्तांचे दिडीला लांबुन पायी चालत जावे लागणार आहे. शासनाची अनेक कोटींची गुंतवणूक होऊनही नागरिकांना जर सुखसुविधा पासून वंचित रहावे लागत असेल तर वरिष्ठ अधिकारींनी या गोष्टीची दखल घेणे गरजेचे आहे. कारवाईचे काय ? या ठेकेदाराने पुलाचे काम करत असतांना लाखो रुपयांचे विना परवाना गौण खनिज उत्खनन व चोरी करून शासनालाही अनेक कोटींचा चुना लावला. यामुळे शासणाचे लाखो रुपयांचे महसूलचे बुडाले आहे. संबंधित ठेकेदाराला कर्तव्यदक्ष तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी सारंग चव्हाण यांनी यापुर्वी अवैध गौण खनिज चोरी प्रकरणी नोटीस बजावली आहे. परंतू पुढे काय झाले हे कळायला मार्ग नाही. अधिकारी मेहेरबान शासकीय अधिकारी हे ठेकेदारवर एव्हढे मेहेरबान का? का त्याची पाठराखण करत आहेत. स्थानिक जबाबदार अधिकारीही नुसते काम पुर्ण करण्याचे पोकळ आश्वासनच देत आहे. जर लवकरच कामाची गती संबंधित ठेकेदारने वाढवली नाही आणि काम पुर्ण केले नाही तर कुरणपिंपरी, आपेगाव, बोरगाव, गुंतेगाव, पाथरवाला, मुंगी, मालेगाव, या गावातील शेकडो नागरिकांना व शेतकरी मोठे जनआंदोलन करण्याच्या तसेच न्यायालयात याचिका दाखल करण्याच्या तयारीत आहेत.



## विद्यानिकेतन केडमीत विद्यार्थी परिषदेची निवडणूक मोठया उत्साहात संपन्न

**श्रीरामपूर | प्रतिनिधी**

दिनांक ७ जुन २०२४ रोजी विद्यानिकेतन केडमीमध्ये विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी परिषदेची नियुक्ती करण्याचा उद्देश शालेय उपक्रम आणि सेवा प्रकल्प आयोजित करून व राबवून नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. शालेय भावना आणि समाज कल्याणासाठी योगदान देणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनाव्यतिरिक्त, विद्यार्थी परिषद हा विद्यार्थी संघटनेचा आवाज आहे. ते विद्यार्थ्यांच्या कल्पना, स्वारस्ये आणि चिंता शालेय समुदायासह सामायिक करण्यात मदत करतात.

प्राथमिक फेरीत, ज्या उमेदवारांनी अर्ज भरले होते, त्यांना ते उभे राहिलेल्या पदांसाठी का निवडून यावेत, यावर त्यांची बाजू मांडण्यासाठी प्रचार करण्यास सांगण्यात आले. हेड बॉय , हेड गर्ल ,स्पोर्ट्स कॅप्टन, हाऊस कॅप्टन पदांसाठी एकूण छत्तीस विद्यार्थ्यांनी नामांकन दाखल केले. दुसऱ्या फेरीत, मतदान मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च समितीने त्यांच्या गुणवत्तेनुसार आणि निवड निकषांच्या आवश्यकतेनुसार जसे शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्टता, क्रीडा, शैक्षणिक गटातील सर्व वर्तन तसेच संपूर्ण कॅम्पसमधील मापदंडांचा समावेश करून विद्यार्थ्यांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याची परवानगी देण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी इव्हीएम मशीनव्दारे गुप्त मतदानाचा आनंद घेतला. नागारिकशास्त्र या विषयातील घटक प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्यासाठी विद्यालयाचा विद्यार्थ्यांना अनुभवाधिष्ठीत शिक्षण देण्याचा हा एक प्रयत्न . सदर मतदानाचा निकाल ८ जुन २०२४ रोजी जाहीर केला जाणार असून शपथ विधी १२ जुन २०२४ असणार आहे. विद्यार्थी परिषदेच्या या निवडणूकीसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे चेअरमन श्री. टी.ई. शेळके सर, व्हा. चेअरपर्सन डॉ . प्रेरणा शिंदे मॅडम, खजिनदार डॉ. राजीव शिंदे सर, विद्यालयाच्या प्राचार्या रंजना जरे मॅडम, उपप्राचार्या वर्षा धामोरे मॅडम, समन्वयक अमित त्रिभुवन सर सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



# आपसी समन्वयातून शासकीय योजनेचे लाभ नागरिकांपर्यंत पोहोचावा-जिल्हाधिकारी


## आरोग्य यंत्रणेचा समग्र आढावा;प्रत्येकाचे आधार कार्ड व बँक खाते काढण्यासाठी विशेष मोहिम

**गडचिरोली । प्रतिनिधी**

प्रत्येक व्यक्तीचा विकास हा केंद्रबिंदू ठेवून शासनामार्फत नागरिकांकरिता विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती त्यांचेपर्यंत पोहोचवून योजनेचा लाभ दुर्गम व अतिदुर्गम भागातील गरजूंना मिळावा यासाठी सर्व विभागाच्या तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय यंत्रणेने आपसात समन्वय राखून एकत्रितपणे काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी आज दिल्या.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतिश सोळंके प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी यांनी पुढे सांगितले की लोकांना सक्षम करणे हाच शाश्वत विकासाचा मार्ग असून यासाठी नागरिकांना त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची जनजागृतीद्वारे जाणीव करून द्यावी. आरोग्य विभागाकडे असलेल्या संसाधने व उपलब्ध सुविधांचा पुरेपूर वापर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.शासनाच्या विविध योजना या आधार संलग्न असल्याने आधार कार्ड व केवायसी झालेले बँक खाते प्रत्येक नागरिकाकडे असणे आवश्यक आहे. त्याअभावी कोणीही शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून विशेष मोहिम राबवून १०० टक्के नागरिकांचे आधार कार्ड व बँक खाते काढावे, यासाठी गावनिहाय सर्व्हेक्षण करण्यासाठी सूचनाही श्री भाकरे यांनी दिल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी पावसाळ्यात आरोग्य विभाग व महसूल विभागात समन्वय राहावा यासाठी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांची यादी महसूल विभागाला उपलब्ध करून देण्याचे सांगितले. ग्रामीण भागातून रूग्णाला जिल्हा मुख्यालयात पाठविण्याची शिफारस करतांना त्याबाबत उपचारासाठी पूर्वतयारी करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना तातडीने पूर्वसूचना देण्याचे निर्देशही श्रीमती सिंह यांनी तालुका आरोग्य यंत्रणेला दिले. पावसाळा कालावधीत दुर्गम भागातील प्रसुती होणार असलेल्या गरोदर महिला यांच्या नियमित संपर्कात राहणे, सर्व महिलांची प्रसुती दवाखाण्यातच होईल याबाबत अलर्ट राहणे, गरोदर मातांना तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनापासून परावृत्त करणे, बालमृत्यू रोखण्यासाठी गरोदर मातांना योग्य आहार मिळतो का याची खातरजमा करणे आदी सूचना त्यांनी दिल्या.यावेळी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, नियमित लसिकरण कार्यक्रम, वातावरणातील बदल आणि मानवी आरोग्य, गाभा समिती, साथरोग सर्वेक्षण, क्षयरोग दुरीकरण आदि विषयांतर्गत विविध बाबींचा आढावा घेण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शिंदे यांनी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची माहिती सादर केली. बैठकीला सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक, बाल विकास अधिकारी व इतर संबंधीत अधिकारी उपस्थित होते.



## प्रतापराव जाधव यांची केंद्रीय कॅबिनेट मंत्री पदी नियुक्ती

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**–महायुतीमधील शिवसेना शिंदे गटाचे लोकसभा बुलढाणा येथून सलग चौथ्यांदा निवडून आले.शिवसेना शिंदे गटाला मिळालेल्या एकमेव मंत्री पदासाठी प्रतापराव यांची वर्णी लागल्याने विदर्भातील शिवसेना शिंदे गटातून पहिले मंत्री झाले असून विदर्भातून यापूर्वी शिवसेनाचे आनंदराव आडसुळ हे मंत्री झाले होते.

तसेच विदर्भातील मातब्बर नेते नितीन गडकरी यांनीही मंत्री पदाची सलग तिसरी वेळ शपथ घेतली. प्रतापराव जाधव हे चौथ्या वेळ निवडून आल्यानंतर आणि त्यात देशात महायुती बहुमतात असल्याने जाधव यांना केंद्रातील मंत्री मंडळात समावेश व्हावा अशी इच्छा बळावली होती. तशी इच्छाही माध्यमाकडे बोलून दाखवले होते.



प्रतापराव जाधव यांची राज्यमंत्री पदासाठी नाव निश्चित होताच छत्रपती संभाजीनगरचे खासदार श्री.संदिपान मामा भुमरे,पालकमंत्री यांनी प्रतापराव जाधव यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

## मद्यधुंद तरुणाच्या सुसाट कार मुळे चार दुचाकींचा झाला चुराडा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पुणे पोर्शे कार अपघाताचे प्रकरण ताजे असताना शहरातील शिवाजीनगर भागात मद्यधुंद तरुणांनी बेफाम कार चालवत धुमाकूळ घातला. भरधाव आणि अनियंत्रित या कारने रस्त्यालगत उभ्या ४ दुचाकींचा अक्षरशः चुराडा झाला. तर एका दुकानासमोर असलेले ६ टेबल व घराच्या ओट्यालाही या कारने धडक देत तोडून टाकले. शनिवारी (दि.८) रात्री साडे अकराच्या सुमारास घडलेल्या या घटनेने शिवाजी नगर परिसरात एकच घबराट पसरली.



दरम्यान, कारचालकासह कारमधील मद्यधुंद चार तरुणांनी कारच्या नंबर प्लेटकाढून टाकत पोबारा केला. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी (दि.८) रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन कडून एक पांढऱ्या रंगाची स्विफ्ट कार क्रमांक (एम एच २० बी वाय ९१३६) वेगाने शिवाजीनगर कडे आली. या कारने एका चारचाकी वाहनाला धडक दिली. या नंतर कार चालकाने प्रगती हार्डवेअर या दुकानासमोर साखळीने बांधून ठेवलेल्या टेबल आणि ग्रीलला जोराची धडक दिली. पुढे या कारचालकाने रोहिणी एमोरियम समोरील ३ मोपेड आणि एका दुचाकीला धडक देत चुराडा केला.

बेफाम झालेल्या कार चालकाने संचिता जेवलर्सच्या ओट्याला आणि खांबाला धडक देत दिली. या अपघाताच्या आवाजाने नागरिक घराबाहेर आले. कार बंद पडल्याने कार मधील चालक आणि तरुणांनी कारच्या दोन्ही बाजूच्या नंबर प्लेट तोडून पोबारा केला.

## उदय सामंत यांचे आश्वासन; बांबू शेतीचा औद्योगिक धोरणात समावेश करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

तापमान वाढीवर जालीम उपाय ठरू शकणाऱ्या बांबू शेतीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध असून, त्यासाठी त्याचा औद्योगिक धोरणात समावेश करण्याबरोबरच सरकारी आस्थापनांमध्ये बांबूच्या वस्तूंचा वापर करून त्याला मार्केट उपलब्ध होण्यासाठी योग्य ती पाऊले उचलू, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये बांबू शेती साथी अनुकूल वातावरण असून, दोन्ही जिल्ह्यातून प्रत्येकी ५०० शेतकरी निवडून त्यांना बांबू शेती करण्यास उत्तेजन दिले जाईल. तसेच याकरता सरकारतर्फे त्यांना आर्थिक मदतही देण्याचे आश्वासन देतो, सामंत महणाले. ते जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लातूर च्या फिनिक्स फाऊंडेशन संस्थेने मुंबईत



आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाला प्रसिद्ध गृहनिर्माण कंपनी रुस्तमजीचे प्रमुख आणि बांधकाम उद्योगातील अग्रणी संस्था क्रेडाईचे राष्ट्रीय अध्यक्ष बोमन इराणी आणि महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष डॉमनिक रोमेल, गोदरेज समूहाच्या रती नादीर गोदरेज, नैसर्गिक शेती तज्ज्ञ पद्मश्री भरत भूषण त्यागी, पर्यावरण तज्ज्ञ डॉ आदिती मोदी आणि महाराष्ट्र कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण टास्क फोर्स चे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल उपस्थित होते. याप्रसंगी लातूर येथील जगदंबा महिला बचत गटाच्या ज्योती शिंदे, फिरोजा दादन, मुंबईच्या पहिल्या सायकलिंग महापौर यांचा सत्कार करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या वेळी संदीप बाजोरिया यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले, या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात शेतकरी व पर्यावरणप्रेमींची उपस्थिती होती. ((बांधकाम क्षेत्रात सुमारे २९ टक्के कार्बन उत्सर्जन होत असल्यामुळे या उद्योगाला प्रदूषण रोखण्यासाठी जोरावे प्रयत्न करणे गरजेचे आहे. याला आपली जबाबदारी समजून पुढील काळात पर्यावरण वाचवण्यासाठी केहाईच्या १४००० समासदांतर्फे बांबू लागवडीबरोबरच इमारत बांधकाम करताना शक्य तिचे धातू आणि इतर लाकहाऐवजी बांबूपासून तयार केलेले दरवाजे, खिडक्या, टाईल्स आणि इतर वस्तु वापरण्याला प्रोत्साहन दिले जाईल. मात्र त्यामुळे बांबूत्या वस्तूंना निर्माण होणारी प्रचंड मागणी पूर्ण करण्याकरता बांबू प्रक्रिया उद्योगाने तयार राहावे. बोमन इराणी, केहाईचे राष्ट्रीय अध्यक्ष



**बहुजन समाज पार्टी तर्फ इतिहासातील महापराक्रमी वीर योद्धा महाराणा प्रताप यांना जयंतीनिमित्त साजरी या प्रसंगी भाईचारा चे अध्यक्ष ( युवा नेते ) राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी महाराणा प्रताप यांना पुष्पहार अर्पण करून जयंती हर्ष उलासात साजरी केली या प्रसंगी राजपूत समाजाचे उमेश सिंग लोधी , सुखलाल सिग राजपूत , मयूर राजपूत , गुरू ठाकूर , सागर राजपूत , उद्योगपती संदीपजी सुरा , विजय भगत , युवा पत्रकार युवराज कुरील , देवचंदजी सावरे व आभार अनिल राम करनाडे यानी केल . आदि जालना वाशी मोठ्या संख्येत उपस्थित होते**

## देशातील २८ कोटी जनता तंबाखूच्या आहारी

# १० पैकी एक व्यक्तीला तंबाखूचे व्यसन केईएम रुग्णालयात अद्ययावत 'तंबाखू बंद क्लिनिक'

**मुंबई । प्रतिनिधी**

तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असून, भारतात तब्बल २८ कोटी ७ लाख लोक तंबाखूचे सेवनाच्या आहारी गेले आहेत. तर यात ५ पैकी एक प्रौढ व्यक्ती (२० कोटी) धुम्रपान करतात, तर १० पैकी एक प्रौढ व्यक्ती (१० कोटी) तंबाखूचे सेवन करत असल्याचे सर्वेक्षणातून समोर आल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयात अद्ययावत 'तंबाखू बंद क्लिनिक' मध्ये गेल्या २० वर्षांपासून तंबाखू सेवनाच्या बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशनचा पुढाकार केईएम रुग्णालयाच्या या उपक्रमाला हातभार लावण्यासाठी बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशन यांनी पुढाकार घेतला आहे. बजाज इलेक्ट्रिकल फाऊंडेशन यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर फंड) द्वारे केईएम रुग्णालयातील तंबाखू बंद क्लिनिक अधिक अद्ययावत केले जाणार आहे. रुग्णाच्या नौदी, विनामूल्य औषधोपचार आणि समुदाय जागरूकता कार्यक्रमांसाठी या उपक्रमाची मदत होणार आहे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आणि बजाज फाऊंडेशनच्या विशेष कार्यकारी अधिकारी मधुरा तळेगावकर यांनी या संयुक्त उपक्रमासाठी एक वर्षाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. याद्वारे 'तंबाखू बंद क्लिनिका द्वारे रुग्णांना अधिक अद्ययावत आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरवणे शक्य होणार आहे. आहारी गेलेल्यांवर उपचार व समुपदेशन केले जाते, असे ही पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. तंबाखू बंद क्लिनिक अद्ययावत करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशन यांच्याशी सामंजस्य करार केला आहे. केईएम रुग्णालयातील



मानसोपचार विभागामध्ये सन १९९१ पासून 'ड्रग डेडिक्शन सेंटर ऑफ एक्सलन्स' हा विभाग सुरू आहे. तसेच गेल्या २० वर्षापासून प्रत्येक बुधवारी सकाळी 'तंबाखू बंद क्लिनिक' संचालित केले जात आहे. तंबाखू अधीन झालेल्या रुग्णांना तंबाखू सोडण्यास मदत करण्यासाठी निकोटीन रिप्लेसमेंट, फार्माकोवेरपी (करिनिकलीन/बुप्रोपियन), समुपदेशन आणि वर्तन सुधारणा सेवा इत्यादी उपक्रम या माध्यमातून राबवले जातात. तसेच केंद्र शाळा, '((फुप्फुसाचे आरोग्य' व्याख्यानात विद्यार्थ्यांची हजेरी सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि राजे एडवर्ड स्मारक (केईएम) रुग्णालयातील सभागृहात, जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून फुप्फुसाचे आरोग्य विषयावर व्याख्यान पार पडले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विविध वैद्यकीय शाखेचे १८६ विद्याग्यांनी यावेळी सहभाग नोंदवला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आणि शैक्षणिक विभागाचे अधिष्ठाता डॉ. होश पाठक होते. फुयुफुसाचे आरोग्य पुनर्संचयित करणी हा व्याख्यानाचा विषय होता. डॉ. रवींद्र रुपवते यांनी फुप्फुसाचे आरोग्य कसे सांभाळावे, यावर प्रकाश टाकला. डॉ. मारिया जैदानी यानी वृद्ध फुप्फुसाचे पुनर्वसन तसेच वृद्धांच्या फुफुसाचे आरोग्य सुधारण्यासाठी कोणते उपाय आणि उपचार शक्य आहेत, याविषयी मा दिली. मुख्य आहारतज्ज्ञ डॉ. सकाला महाडिक यांनी फुफुसाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी कोणता आहार घ्यावा, या विषयावर माहिती दिली. माजी विद्यार्थी संघटनेतर्फे विशेष अतिथी म्हणून मेंदूविकार विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. सुनील पंडवा यांचेही व्याख्यान झाले.)) महाविद्यालये आणि समुदायामध्ये तंबाखू वापर प्रतिबंधासाठी स्वतंत्रपणे तसेच स्वयंसेवी संस्था, पोलिस आदीच्या सहकायनि अनेक जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात.

# मुंगशी विद्यालयाला मनोज जरांगे पाटील यांचे नाव

## शिक्षण महर्षी बाळासाहेब कोरके यांच्या जय जगदंबा शिक्षण संस्थेचा ठराव

“ मनोज जरांगे – पाटील यांच मराठा समाजासाठी फार मोठं योगदान आहे त्यांनी केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाचा फायदा शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक जिवनात होणार आहे त्यामुळे आमच्या संस्थेच्या विद्यालयास त्यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला आहे.

**– डॉ. कपिल कोरके अध्यक्ष जय जगदंबा शिक्षण संस्था**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे – पाटील यांचे नाव आमच्या गावातील शाळेला देऊन मुंगशी गावाची महाराष्ट्रात मान उंचावली असुन आम्हा ग्रामस्थांना याचा सार्थ अभिमान आहे.

**– आशिष क्षीरसागर , उपसरपंच मुंगशी**








**सोलापूर । निलेश उबाळे**

बार्शी तालुक्यातील मुंगशी ( दहिटणे ) येथे १९९८ मध्ये जय जगदंबा शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी बाळासाहेब कोरके यांनी मुंगशी विद्यालयाची स्थापना केली. आज त्याच शाळेचे नाव बदलून शाळेला मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे – पाटील यांचे नाव देण्याचा ठराव संस्थेचे अध्यक्ष डॉ कपिल कोरके यांच्या अध्यक्षते खाली मंजूर करण्यात आला यामुळे महाराष्ट्रात पहिल्यांदाच हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे मुंगशी विद्यालय या शाळेचे नाव यापुढे मनोज जरांगे पाटील विद्यालय , मुंगशी ( दहिटणे ) ठेवण्यात येणार असून या शाळेचे नामकरण मनोज जरांगे पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे. तसेच या कार्यक्रमास स्वराज्य संघटनेचे संस्थापक छत्रपती संभाजी राजे प्रमुख पाहुणे असणार आहेत तसेच विशेष बाब म्हणजे महाराष्ट्रातील २६ मराठा खासदारांना या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले जाणार आहे.

सध्या विद्यालयात ५ वी ते दहावी पर्यंत वर्ग चालू असून या शाळेत मुंगशी,दहीटणे येथील शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेचे वैशिष्टय म्हणजे दहावीच्या शंभर टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे. मनोज जरांगे पाटील यांचं मराठा समाजासाठी मोठ योगदान आहे तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळाले तर शालेय विद्यार्थांना याचा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे आपल्या समाजासाठी आपण ही काहीतरी देण लागतो या उदात्त हेतूने आपण हा निर्णय घेतल्याचे संस्थेचं अध्यक्ष डॉ कपिल कोरके यानी सांगीतले.




# लोकबिरादरी शाळेचा निकाल दहावी, बारावीत अव्वल











**हेमलकसा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती आनंदवन वरोरा द्वारा संचलित लोकबिरादरी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने यावर्षीही उत्कृट निकालाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच झालेल्या परीक्षेत इयत्ता दहावीचा निकाल ९७.४२ टक्के लागला असून कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९७.७२ टक्के असा आहे. इयत्ता दहावीत साक्षी बलराम बाकडा– ८५ टक्के , काजल कटिया धुर्वे ८३.८० टक्के, कमला नाथू बाकडा– ८०.२० टक्के, तन्वी संतोष कुडयामी ७६.८० टक्के किरण नवलू मडावी ७२.८० टक्के , सुदर्शन धनराज भगत ८१.४० टक्के ,रोहित दलसू पिडसे ७३.२० टक्के ,दिलीप सोमा पुंगाटी ७१.४० टक्के , विनय गोमेश दुगा ६८.२० टक्के , अजय बिजू मडावी ६७.५० टक्के गुण मिळवून विद्यालयाचा लौकिक वाढवला आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले असून अश्विनी मिच्छा मादी ७६.५० टक्के , महिमा जूजा मडावी ७६.०० टक्के , लक्ष्मी राजू पुंगाटी ७४.१७ टक्के प्रभाकर संभा सडमेक ७३.६७ टक्के निर्मला दोगे नरोटी ७३.६७ टक्के यांनी शाळेतून पहिल्या पाच क्रमांकात स्थान पटकावले आहे.

इयत्ता १२ वीत प्रथम आलेली कु.अश्विनी मादी मिच्छा ही राज्य खेळाडू असून तिचा इव्हेंट ४४०० मीटर रिले आहे.अश्विनी एकात्मिक आदिवासी विभागांतर्गत आश्रम शाळेच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा नाशिक येथे ४४०० मीटर रिले खेळ प्रकारात प्रथम प्राविण्य प्राप्त खेळाडू आहे. लक्ष्मी राजू पुंगाटी ही शालेय विभागांतर्गत होणाऱ्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत तालुका क्रीडा संकुल विसापूर– बल्लारशाह येथे ४ किमी क्रॉस कंट्री धावणे खेळ प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत ६ वा क्रमांक प्राप्त केला आहे. आदिवासीबहुल विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. ज्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षकांच्या देखरेखीखाली सुपरवायझर स्टडी, दिवाळीनंतर दोनदा सराव परीक्षांचे आयोजन, विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन आणि गुगल मीटच्या माध्यमातून दुरस्त तज्ज्ञांचे मार्गदर्शन, इंग्रजी विषयाचे सेल्फ स्टडी अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. भामरागड, एटापल्ली परिसरात या शाळेने निकालाचा उच्चांक गाठला आहे. संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे, अनिकेत आमटे, समीक्षा आमटे, डॉ. दिगंत आमटे, डॉ. अनघा आमटे यांच्या मार्गदर्शनात शालेय शिक्षक व कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.






# वरोरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा





**वरोरा । प्रतिनिधी**

युग पुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेचे राज्य या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन कल्याणकारी राज्याच्या निर्मिती साठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पक्षाच्या दिनांक १० जून ते १७ जून या कालावधीत पक्षाच्या २५ वा वर्धापन दिनानिमित्त वर्धापन दिन सप्ताह मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे.

दिनांक १० जून २०२४ ला सकाळी १०.१० वा ध्वजारोहण करण्यात आले.ध्वजारोहण नंतर महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारताच्या राज्यघटनेतील उद्देशिका चे वाचन करण्यात आले. वरोरा विधानसभा मतदारसंघातील गाव पातळीतील प्रत्येक क्षेत्रातील मान्यवरांचे जेष्ठ नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांना शतायुषी व्हा अशा शुभेच्छा देऊन त्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यात ना. गो. थुटे, झामराव लांबट ,तानेबाई लांबट ,डोमाजी वाटेकर ,त्रिवेणी वाटेकर , गणपत वांगे –, बारकू एकरे ,सुमनबाई तिखट , नानाजी मुसळे ८१, त्रवेना मुसळे ८१, सुनीता आवारी इत्यादी मान्यवरांचे सन्मान करण्यात आला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विलास नेरकर, रंजना पारशिवे, जनाबाई पिपंळशेडे, चंद्रकांत कुंभारे, रवींद्र भोयर, योगिता लांडगे, सुनीता नरडे, दिलीप खैरे, सुधाकर उपरे व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंचायत समिती भामरागड तर्फे ‘मिशन पुना आकी’चा आरंभ







**गडचिरोली–**भामरागड तालुक्यातील लोकांच्या आधार कार्ड व जन्म दाखला मिळण्यासंबंधीच्या अडचणी सोडवण्याकरिता तसेच महिला आरोग्यावर जनजागृती व्हावी याकरिता पं.स.भामरागड तर्फे आकांक्षीत तालुका कार्यक्रम अंतर्गत ’मिशन पुना आकी’ म्हणजेच ’मिशन नवी पालवी’ ही मोहीम हाती घेतली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .